Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4 डॉ.भालचंद्र देशमुख ISSN:-2230-7850

Research Papers

# भारतातील ग्रामीण–शहरी साक्षरताः तुलनात्मक विश्लेषण

डॉ.भालचंद्र देशमुख
सहा.प्राध्यापक
जी.एन.आझाद समाजकार्य महाविद्यालय पुसद
जि.यवतमाळ

*प्रस्तावना :–*

कोणत्याही देशासाठी साक्षरता हा घटक अतीशय महत्वपुर्ण असून देशाचा सर्वांगीन विकास साक्षरतेवरच अवलंबुन असतो. तद्‌वतच व्यक्तीच्या विकासामध्ये सुध्दा साक्षरता हा घटक विशेष भुमिका पार पाडीत असतो. या महत्वातुनच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर साक्षरतेवर विशेष भर देऊन मृतावस्थेत असलेल्या भारतातील साक्षरतेला जीवंत करण्याचे प्रयत्न सातत्याने केल्या जात आहे. त्याचीच फलनिश्पत्ती सन 1951 मध्ये असलेले साक्षरतेचे प्रमाण 18.33 टक्के वरून पुढील सहा दशकात म्हणजचेच सन 2011 मध्ये 74.04 टक्केवर जाऊन पोहचले. साक्षरतेमधील ही वाढ 55.71 टक्के होती. ही वाढ जरी मोठया प्रमाणावर असली तरी मात्र ग्रामीण भागातील साक्षरतेत शहरी साक्षरतेच्या तुलनेत अदयापही मोठया प्रमाणावर तफावत असल्याचे दिसून येते. ज्यामुळे ग्रामीण भागातील जीवनमानामध्ये फारसा बदल घडून आला नाही.

प्रस्तूत शोध लेखातून भारतात स्वातंत्र्योत्तर काळात साक्षरतेत कशा प्रकारे बदल होत गेला व शहरीच्या तुलनेत ग्रामीण भाग साक्षरतेत कशा प्रकारे मागे पडला यासंदर्भात तुलनात्मक दृष्टिकोणातून प्रकाश टाकण्यात आला असून यासाठी उपलब्ध दुय्यम स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे.

### ग्रामीण व शहरी महिला साक्षरता

स्वातंत्र्य पुर्व काळात महिला साक्षरतेच्या काळात अतीशय मागे होत्या. ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधांचा अभाव, सामाजिक दृष्टिकोण, महिलांसंदर्भात नकारात्मक धोरण अशा विविध कारणातून ग्रामीण महिला शिक्षणापासून वंचीत राहील्यात सन 1901 मध्ये महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण केवळ 0.6 टक्के होते; ते सन 1951 पर्यंत 8.86 टक्केपर्यंत जाऊन पोहचले. यावर्षी ग्रामीण महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण होते 4.87 टक्के तर शहरी महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण होते; 22.33 टक्के. या आकडेवारीवरून स्वातंत्र्य पुर्व काळातील ग्रामीण महिलांच्या शिक्षणाच्या स्थितीचा बोध होतो. ग्रामीण व शहरी महिलांच्या साक्षरतेमध्ये जी तफावत होती ती 17.46 टक्के (सारणी 2). ही तफावत स्वातंत्र्यानंतरच्या काळात सुध्दा कायम राहीली नव्हे त्यामध्ये प्रत्येक दशाकामध्ये केल्या गेलेल्या जनगणनेत वाढ झाल्याचेच दिसून येते. सन 1961 मध्ये ही तफावत जवळपास दुप्पट होऊन 30.40 टक्के पर्यंत जाऊन पोहचली. यावर्षी ग्रामीण महिलांची साक्षरता होती; 10.10 टक्के तर शहरी महिलांच्या साक्षरतेत वाढ होऊन ती 40.50 टक्के झाली. यावर्षी भारतातील एकूण महिला साक्षरतेचे प्रमाण 15.35 टक्के नोंदविल्या गेले.

ग्रामीण महिलांच्या साक्षरता वाढीची गती मंद गतीने होत गेली परिणामतः सन 1971 मध्ये सुध्दा शहरी महिलांच्या तुलनेत ग्रामीण महिलांच्या साक्षरतेत मोठया प्रमाणात तफावत नोंदविल्या गेली. यावर्षी दशोकोत्तर तफावत 33.30 टक्के होती. यानंतर सुध्दा पुढील काळात ही तफावत कायम राहीली. सन 1981 मध्ये 36.60 टक्के, सन 1991 मध्ये 33.40 टक्के, सन 2001 मध्ये 26.50 टक्के व सन 2011 मध्ये 21.10 टक्के, अशाप्रकारची तफावत नोंदविल्या गेली. निश्चीतच ग्रामीण महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात बदल पहावयास मिळत असला तरी मात्र शहरी महिलांच्या तुलनेत जी तफावत दिसून येते त्यातून विकासाचे चक्र कसे एकतर्फी फिरत आहे हे स्पश्ट होते. सन 2011 मध्ये शहरी महिलांची साक्षरता 79.9 टक्के नोंदविल्या गेली तर ग्रामीण महिलांचे साक्षरतेचे प्रमाण होते 58.8 टक्के.

### ग्रामीण व शहरी पुरुषांची साक्षरता

महिलांच्या साक्षरतेमध्ये जी तफावत पहावयास मिळते त्याचप्रमाणे ग्रामीण पुरूष व शहरी पुरूषांच्या साक्षरतेमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते. सन 1951 मध्ये ग्रामीण पुरूशांच्या साक्षरतेची टक्केवारी होती 19.02 तर शहरी पुरूषांची साक्षरतेची टक्केवारी होती 45.60. पुरूषांच्या साक्षरतेत तफावत होती 17.46 टक्क्यांची. सन 1961 मध्ये ग्रामीण पुरूषांच्या साक्षरतेत वाढ होऊन 34.30 टक्के तर शहरी पुरूषांची टक्केवारी वाढून 66.00 झाली. सन 1971 ते 2011 या काळात ग्रामीण पुरूषांची टक्केवारी वाढत गेली ती अनुक्रमे सन 1971 –48.60 टक्के, सन 1981–49.60 टक्के, सन 1991–57.90 टक्के, सन 2001–71.40 टक्के व सन 2011 मध्ये 78.6 टक्के अशा प्रकारची होती तर याच काळात शहरी पुरूषांची साक्षरता टक्केवारी अनुक्रमे 69.80 टक्के, 76.70 टक्के, 81.10 टक्के, 86.70 टक्के, व 89.7 टक्के होती. यामधील तफावत अनुक्रमे सन 1971 –21.20 टक्के, सन 1981–27.10 टक्के, सन 1991–23.20 टक्के, सन 2001–15.30 टक्के

Please cite this Article as : डॉ.भालचंद्र देशमुख , भारतातील ग्रामीण–शहरी साक्षरताः तुलनात्मक विश्लेषण : Indian Streams Research Journal (MAY ; 2012)

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

व सन 2011 मध्ये 11.10 टक्के अशा प्रकारची होती. महिलांच्या तुलनेत ग्रामीण–शहरी पुरूषांच्या साक्षरतेमधील तफावत कमी आढळून येते.

ग्रामीण–शहरी एकूण साक्षरता

ग्रामीण–शहरी; महिला, पुरूषांच्या साक्षरतेमध्ये ज्याप्रमाणे तफावत आढळून येते, त्याचप्रमाणे ग्रामीण–शहरी एकूण साक्षरतेमध्ये सुध्दा प्रचंड प्रमाणात तफावत दिसून येते. सन 1951 मध्ये भारतातील एकूण साक्षरतेचे प्रमाण होते, 18.33 टक्के त्यामध्ये ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण 12.10 टक्के तर शहरी साक्षरतेचे प्रमाण 34.59 टक्के होते. ही तफावत 22.49 टक्के होती. सन 1961 मध्ये एकूण साक्षरतेत (28.30 टक्के) ग्रामीण साक्षरतेचा वाटा होता 22.50 टक्के व शहरी साक्षरतेचा वाटा होता 54.40 टक्के मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी ही तफावत वाढून 31.9 टक्केवर जाऊन पोहचली. पुढील दहा वर्षात जवळपास दोन टक्केची वाढ होऊन, ग्रामीण–शहरी साक्षरतेची तफावत 32.3 टक्के नोंदविल्या गेली. यावर्शी भारताची एकूण साक्षरता 34.45 होती. त्यामध्ये ग्रामीण साक्षरता 27.90 टक्के व शहरी साक्षरता 60.20 टक्के होती. सन 1981 मध्ये या तफावतील अल्पशी घट झाली. यावर्शी ही तफावत 31.2 टक्के होती. तर एकूण साक्षरता ग्रामीण–शहरी अनुक्रमे 36.00 टक्के व 67.20 टक्के होती. यावर्शी भारतातील साक्षरतेचे प्रमाण होते 43.57 टक्के.

सन 1991 मध्ये या तफावतीत पुन्हा घट झाली. परंतू ही घट होण्यामध्ये ग्रामीण भागातील साक्षरतेत वाढ झाल्यामुळे ही घट झालेली नव्हती, तर यावर्षी शहरी साक्षरतेत जी वाढ झाली होती तीचे प्रमाण कमी होते. मागील दशकातील एकूण साक्षरतेत वाढ होऊन 52.21 टक्के झाली. तर ग्रामीण साक्षरता 44.70 व शहरी साक्षरता 73.10 टक्के झाली. सन 2001 व 2011 यावर्षी भारतातील एकूण साक्षरता 65.38 टक्के व 74.04 टक्के होती.

सन 2001 मध्ये शहरी साक्षरतेच्या तुलनेत ग्रामीण साक्षरतेमधील तफावत 1991 च्या तुलनेत कमी होऊन 20.9 टक्के होती. त्यानंतर सन 2011 मध्ये झालेल्या जनगणनेत पुन्हा घट नोंदविल्या गेली. यावर्षी दोन क्षेत्रातल्या साक्षरतेमधील तफावत 16.1 टक्के नोंदविल्या गेली.

सारणी 1

ग्रामीण–शहरी साक्षरता प्रमाण (सन 1951 ते 2011)

| वर्ष–क्षेत्र | पुरूष | महिला | व्यक्ती |
|---|---|---|---|
| 1951 | | | |
| ग्रामीण | 19.02 | 4.87 | 12.10 |
| शहरी | 45.60 | 22.33 | 34.59 |
| एकूण | 27.16 | 8.86 | 18.33 |
| 1961 | | | |
| ग्रामीण | 34.30 | 10.10 | 22.50 |
| शहरी | 66.00 | 40.50 | 54.40 |
| एकूण | 40.40 | 15.35 | 28.30 |
| 1971 | | | |
| ग्रामीण | 48.60 | 15.50 | 27.90 |
| शहरी | 69.80 | 48.80 | 60.20 |
| एकूण | 45.96 | 21.97 | 34.45 |
| 1981 | | | |
| ग्रामीण | 49.60 | 21.70 | 36.00 |
| शहरी | 76.70 | 56.30 | 67.20 |
| एकूण | 56.38 | 29.76 | 43.57 |
| 1991 | | | |
| ग्रामीण | 57.90 | 30.60 | 44.70 |
| शहरी | 81.10 | 60.00 | 73.10 |
| एकूण | 64.13 | 39.29 | 52.21 |
| 2001 | | | |
| ग्रामीण | 71.40 | 46.70 | 59.40 |
| शहरी | 86.70 | 73.20 | 80.30 |
| एकूण | 75.85 | 54.16 | 65.38 |
| 2011 | | | |
| ग्रामीण | 78.60 | 58.80 | 68.90 |
| शहरी | 89.70 | 79.90 | 85.00 |
| एकूण | 82.14 | 65.46 | 74.04 |

स्त्रोतः सेंसस ऑफ इंडीया 2001–2011

**Please cite this Article as :** *डॉ.भालचंद्र देशमुख* **,** *भारतातील ग्रामीण–शहरी साक्षरताः तुलनात्मक विश्लेषण* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

सारणी 2

शहरी साक्षरतेच्या तुलनेत ग्रामीण साक्षरतेमधील फरक (शेकडा प्रमाणात)

| वर्ष | पुरूष–पुरूष | महिला–महिला | एकूण व्यक्ती |
|---|---|---|---|
| 1951 | 26.28 | 17.46 | 22.49 |
| 1961 | 30.70 | 30.40 | 31.90 |
| 1971 | 21.20 | 33.30 | 32.30 |
| 1981 | 27.10 | 36.60 | 31.20 |
| 1991 | 23.20 | 33.40 | 28.40 |
| 2001 | 15.30 | 26.50 | 20.90 |
| 2011 | 11.10 | 21.10 | 16.10 |

### निश्कर्श

भारतात भौगोलीक आधारावर संरचनात्मक बदल आढळून येतो. त्याचा प्रभाव सामाजिक विचारधारेवर पडुन स्वातंत्र्यपुर्व काळापासून विकासाच्या बाबतीत शहरी व ग्रामीण अशी तफावत पहावयास मिळते. ग्रामीण क्षेत्राच्या तुलनेत शहरी क्षेत्रात मोठया प्रमाणात सुविधा पुरविल्या गेल्यात त्याचा प्रभाव शिक्षण क्षेत्रावर होऊन शिक्षणाचा प्रसार शहरी भागात अधिक प्रमाणात झाला. पुरूष असो अथवा महिला या दोन्ही घटकांनी शिक्षणाच्या बाबतीत आघाडी घेऊन विकासाकडे वाटचाल केली. त्यातुलनेत ग्रामीण क्षेत्रातून वास्तव्य करीत असलेली जनता शिक्षणाच्या तुलनेत फारशी समाधानकारक प्रगती करू शकलेली नाही. शासन सुध्दा ग्रामीण भागात शिक्षणाच्या सोयी सुविधा पुरविण्यास कमी पडले. त्याचा प्रत्यक्ष प्रभाव शहरी व ग्रामीण साक्षरता यांच्यात तफावत निर्माण होण्यावर झाला.

### संदर्भ सुची

चंद्रकांत ॲट ऑल. 2007.''सिलेक्टटेड एज्युकेशनल स्टॅटीस्टीक''.दिल्ली. भारत सरकार.हयुमन रिसोर्स डेव्हलपमेंट.
सेंसस रिपोर्ट. 2001.दिल्ली. भारत सरकार
सेंसस रिपोर्ट. 2011.दिल्ली. भारत सरकार
सेनल देसाई ॲट ऑल. 2010.''हयुमन डेव्हलपमेंट ऑफ इंडिया''.दिल्ली ऑक्सफोर्ड यूनिव्हर्सीटी प्रेस दिल्ली.
.........2011.''स्टेटस ऑफ लिट्रसी''. दिल्ली. भारत सरकार.

**Please cite this Article as :** *डॉ.भालचंद्र देशमुख , भारतातील ग्रामीण–शहरी साक्षरताः तुलनात्मक विश्लेषण* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**